**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग**
**उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जुनी जिल्हा परिषद परिसर, वाशिम**
**दुरध्वनी:- ०७२५२-२३५३७४**

## सहाय्यता गटांचे अभिलेखे छपाई बाबत इच्छुक पुरवठादारांकडुन अर्ज मागविण्याबाबत.

ग्रामीण भागातील दारिद्रयाचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून दिनदयाल अंतोदय योजना (राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची) सुरुवात केली आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यात उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्यामार्फत करण्यात येते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम अंतर्गत जिल्हयातील स्वयंसहाय्यता गटांसाठी लागणारे अभिलेखे छपाई करणे आहे. त्याकरीता प्रिंटिगचा व्यवसाय करणा-या व्यक्तीकडून मर्यादित ई- निविदा (Limited e- tender) या प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येणार आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रिंटिग व्यवसाय करणा-याकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

१. DSC (Digital Signature Certificate)
२. https://mahatenders.gov.in या संकेतस्थळ/पोर्टलवर नोंदणीकृत असावा.
३. प्रिंटिग व्यवसायासाठी आवश्यक असलेले नोंदणीकृती केलेले प्रमाणपत्र.
४. PAN कार्ड असावे व GST नोंदणी प्रमाणपत्र.

वरील प्रमाणे अटींची पुर्तता करणाऱ्या इच्छुक पुरवठादारांनी त्यांच्या https://mahatenders.gov.in वर नोंदणीकृत केलेला Registered Id तसेच वर नमुद केलेल्या क्रमांक ३ व ४ या कागदपत्रासह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,वाशिम जुनी जिल्हा परिषद इमारत परिसर, होन्डा शो रुम समोर, वाशिम या कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा drdawashim@gmail.com या ई-मेल ID वर दि. २४ / ०८ /२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत लेखी अर्ज करण्यात यावा. मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मर्यादित ई-निविदा https://mahatenders.gov.in वर प्रसिध्द झाल्यानंतर कोणत्याही पुरवठादारांना सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी करुन घेता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक प्रिंटीग व्यवसाय करणाऱ्या कडुन कोणतीही निविदा शुल्क कोणतीही निविदा शुल्क व EMD रक्कम घेण्यात येणार नाही.

**प्रकल्प संचालक**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**
**वाशिम**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वाशिम**
**तथा**
**अध्यक्ष कार्यकारी समिती**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,**
**वाशिम**

Scanned by CamScanner